माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : ८४४/२०२५

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| सौ. सुरुचि उज्ज्वल गोवर्धन, ८४ मेघमल्हार अपार्टमेन्टस, दिनदयाल नगर, नागपूर | दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि. (अवसायनात), वेस्ट हायकोर्ट रोड, स्वामी आर्केड बिल्डींग, धरमपेठ, नागपूर-४४००१० | दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि. (अवसायनात), वेस्ट हायकोर्ट रोड, स्वामी आर्केड बिल्डींग, धरमपेठ, नागपूर-४४००१० |

### सुनावणी दिनांक :- ०१.०७.२०२६

१. उपस्थिती –

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. व्दितीय अपील अर्ज –

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २४.०३.२०२५

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०२.०४.२०२५

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपील केल्यावरही कसलाही प्रतिसाद मिळाला नाही.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

३. माहिती अर्ज –

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०.१२.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०.१२.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. ०१.०१.२००५ ते आजपर्यंत.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : माझे गृह कर्ज खाते वाहन, कर्ज खाते बंद झालेले आहे. मी हयापुर्वीही अवसायकाला माझे मूळ दस्ताऐवज मागणी केलेली आहे. मा. अवसायकानीच मागणी केल्यानुसार माझ्याजवळ असलेल्या रेकॉर्डनुसार कर्ज खाते क्रमांक दि. ११.१०.२०२४ च्या पत्रातून कळविलेले आहे. तरीही

आजपर्यंत माझेच मुळ विक्रीपत्र घराचे आणि इतर संबंधित दस्ताऐवज दिलेले नाही. तसेच वाहन कर्जाचेही आर.टी.ओ. clearance दिलेले नाही. ते देण्यात यावे. फ्लॅटसच्या Redevelopment करीता तसेच वाहनाची पुर्ननोंदणीकरीता मला संपुर्ण माझेच दस्ताऐवज आवश्यक आहे, ते देण्यात यावे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ नुसार विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद/माहिती दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २४.०१.२०२५

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : आजपर्यंत मागितलेले महत्वाचे मूळ दस्ताऐवज न मिळाल्यामुळे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर विहीत मुदतीत सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, माहिती अर्जान्वये कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे संबंधितांना मूळ दस्ताऐवज देण्याबाबत आदेशित करावे.

२. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा परीरक्षक, दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि. नागपूर, श्री. पंकज वानखेडे उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७.०१.२०२५ रोजी अपिलार्थीस पत्र दिलेले आहे. त्यानंतर दिनांक ११.०४.२०२५ रोजी अपिलार्थी यांना वाहन कर्जाचे आर.टी.ओ. clearance दिलेले आहे. सदर सहकारी बँक ही दिनांक ०९.११.२००२ ला अवसायनात आलेली असल्यामुळे सदर बँकेचा संपुर्ण रेकॉर्ड हा मुख्य कार्यालयात जमा करुन ठेवण्यात आलेला आहे. तसेच मा. कोर्टात केस प्रलंबित असल्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेले मूळ दस्ताऐवज त्यांना देण्याबाबत मा. कोर्टाला विचारणा केली असता, मा. कोर्टाने मूळ दस्ताऐवज न देण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेले मूळ दस्ताऐवज देता येणार नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या दस्ताऐवजाच्या झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्याकरीता सदर कार्यालयात माहितीचा शोध घेतला असता, माहिती आढळून आलेली नाही. पुनश्चः माहितीचा शोध घेवून दस्ताऐवज आढळून आल्यास ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येईल.

**६. निष्कर्ष —**

सदर प्रकरणी अपिलार्थी सौ. सुरुचि उज्ज्वल गोवर्धन यांनी दिनांक १०.१२.२०२४ रोजी दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि. (अवसायनात), वेस्ट हायकोर्ट रोड, स्वामी आर्केड बिल्डींग, धरमपेठ, नागपूर यांचेकडे माहितीसाठी अर्ज केला होता. या माहिती अर्जाला दिनांक ०७.०१.२०२५ रोजी



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

प्रतिसाद दिला असल्याचे, आज सुनावणीला उपस्थित असलेले विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. तसेच अपिलार्थीस दिनांक ११.०४.२०२५ रोजी वाहन कर्जाचे आर.टी.ओ. clearance दिलेले असल्याचेही नमूद केले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी वाहन कर्जाचे आर.टी.ओ. clearance मिळाले असल्याच मान्य केले आहे. परंतु उर्वरित कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने नमूद केले आहे.

आज सुनावणी दरम्यान दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर आयोगाकडून विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखावर कसून शोध घ्यावा आणि त्यांना संपुर्ण माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य प्रदान कराव्या.

तसेच दि नागपूर महिला नागरी सहकारी बँक लि. (अवसायनात), नागपूर बँकेने अपिलार्थीने मागितलेली माहिती द्यावी किंवा कसे, याबाबत मा. कोर्टाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस तत्काळ विनामूल्य देण्यात याव्या. तसेच कोर्टाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ मध्ये मागितलेल्या मूळ दस्ताऐवजांच्या प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून, प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०१.०७.२०२६

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जावक क्रमांक ५६५६ दिनांक 1 JUL 2026